स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**रासेयो/२०२२–२३/९२८ सुधारित परिपत्रक दि. ३१/०१/२०२३**

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : अवयवदान जनजागृती ऑनलाईन प्रशिक्षण उपक्रमाबाबत**

**महोदय/महोदया,**

दर दोन मिनिटाला प्रत्यारोपणासाठी अवयव न मिळाल्याने, मृत्यूशैयेवरील एका रुग्णाचे, अवयव प्रतिक्षायादीवरच निधन होते. रस्त्यावरील अपघातात दरवर्षी निधन पावणाऱ्या दिड लाख व्यक्तींचे जर अवयवदान जागृतीने अवयव दात्यांत रूपांतर करता आले, तर प्रत्येक रुग्णाला जीवनदायी अवयव मिळेल. म्हणूनच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व व्हीफॉर ऑर्गन्स फाऊंडेशन, पुणे (V4organs Foundation, Pune) यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो संलग्नीत महाविद्यालयातील स्वयंसेवक व अन्य विद्यार्थ्यांना अवयवदान जागृतीचे ऑनलाइन प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

प्रशिक्षण ८ प्रकरणात विभागले असून, प्रशिक्षण सामुग्री सॉफ्ट कॉपी स्वरूपात तयार आहे. विद्यार्थ्यांना आपल्या मोबाईलचा वापर करून, वैयक्तिक सोयीच्या वेळेत, सोयीच्या ठिकाणी अभ्यास करून हे प्रशिक्षण २६ फेब्रुवारी, २०२३ पूर्वी पूर्ण करायचे आहे. प्रशिक्षण पुर्णपणे मोफत असून, ते पूर्ण झाल्यावर प्रत्येकाला ई- सर्टिफिकेट मिळेल. त्याशिवाय ज्या कॉलेजचे सर्वाधिक विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करतील अशा १५ कॉलेजच्या रासेयो विद्यार्थी प्रमुखांना शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात येईल. २६ फेब्रुवारी रोजी अवयव दान विषयावर सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात येईल. त्यातील प्रथम १० क्रमांकांना बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या अर्थसहाय्याने शिष्यवृत्ती देण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी नोंदणी आवश्यक असून त्यासाठी पुढीलप्रमाणे गुगल फॉर्मची लिंक देण्यात आलेली आहे. नोंदणी फॉर्म सोबत पहिल्या प्रकरणाच्या अभ्यास सामुग्रीची लिंक मिळेल आणि त्यानंतर क्रमशः पुढील प्रकरणांच्या लिंक मिळतील. प्रकरणावर छोटेसे व्याख्यान, माहिती पुरवणी, प्रश्नमंजुषा व छोटासा आकर्षक अवयव दानावरील व्हिडिओ असे अभ्यास सामुग्रीचे घटक असतील. त्यासाठी रासेयोची प्रस्थापित वितरण व्यवस्था वापरली जाईल. रासेयो कार्यालयातून जिल्हा व विभाग समन्वयक व त्यानंतर त्यांच्याकडून कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थ्यांपर्यंत, प्रशिक्षण साहित्याचे वितरण केले जाईल. महाविद्यालयाच्या स्तरावर योजना कार्यान्वित करण्यासंबंधी येणाऱ्या अडचणींसाठी मार्गदर्शक सूचना मिळणे व इतर माहितीकरिता टेलिग्राम समूह तयार केला आहे. यामध्ये सर्व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी व्हावे. महाविद्यालयनिहाय प्रशिक्षणासाठी किती विद्यार्थांची नोंदणी व किती विद्यार्थांचे प्रशिक्षण पूर्ण झाले याची माहिती येथे सर्वांना मिळेल.

तरी अवयवदान जनजागृती ऑनलाईन प्रशिक्षण उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर सेवक यांना सहभागी होण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

*प्रशिक्षण नोंदणी फॉर्म लिंक:*
https://docs.google.com/forms/d/1pj7gjOhwvsg93nvoRbynSB_0y_F6eWDxz0e8B9LjgxA/edit?usp=drivesdk
*टेलिग्राम खात्याकरिता प्रवेश लिंक: कार्यक्रम अधिकारी व रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी:* https://t.me/+UYIuBXX8FZU1Y2VI
***अधिक माहितीकरिता संपर्क : श्री. श्रीकांत आपटे, ९८२००७८२७३ (व्हॉट्सअप)***

**अवयवदान जनजागृतीवर ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मार्गदर्शक.**

१) हे अगदी सोपे आहे,
२) नोंदणी लिंक उघडा आणि ऑनलाइन नोंदणी करा,
३) प्रशिक्षणात ८ प्रकरणे आहेत, ज्यामध्ये आठ प्रश्नावली आहेत,
४) अभ्यास- साहित्याच्या सॉफ्ट कॉपीची लिंक खाली दिली आहे,
५) या शिवाय नोंदणी फॉर्मच्या शेवटच्या परिच्छेदात आणि प्रत्येक प्रश्नावलीत, पुढील प्रकरणाच्या अभ्यास- सामग्रीची लिंक दिली आहे,
६) प्रश्नावलीचा प्रतिसाद दाखल (सबमिट) केल्यावर, विद्यार्थ्यांच्या गुणांची त्वरित ईमेलद्वारे माहिती दिली जाते,
७) विद्यार्थ्यांना पुढील २४ तासांच्या आत ती प्रश्नावली पुन्हा सबमिट करून गुण सुधारण्याची संधी आहे,
८) प्रत्येक प्रकरणत होण्यासाठी किमान ५०% गुण आवश्यक आहेत,
९) सर्व ८ अध्याय पूर्ण झाल्यावर, पुढील पंधरवड्यात ई-प्रमाणपत्र विद्यार्थ्याला ईमेल केले जाईल.
१०) अभ्यास साहित्यात (सॉफ्ट कॉपी) एक व्हिडिओ लेक्चर, एक लेखन, एक प्रश्नावली आणि एक लहान मनोरंजक व्हिडिओ, असतात
११) ज्या महाविद्यालयांमधून जास्तीत जास्त विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करतात त्या प्रथम १५ महाविद्यालयांच्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र आणि त्यांच्या रासेयो विद्यार्थी प्रतिनिना शिष्यवृत्ती, प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रत्येक २५० विद्यार्थ्यांमागे एक शिष्यवृत्तीच्या प्रमाणात, देवून सन्मानित केले जाईल.
१२) अधिक माहिती/प्रश्नांसाठी लिंक वापरून खालील टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील व्हावे,
१३) या शिवाय **रविवार २६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता** ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली जाईल, ज्यासाठी कोणतीही वेगळी नोंदणी नाही, फक्त विद्यार्थ्याने वेगळ्या लिंकचा वापर करून दुसऱ्या विशिष्ट टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील व्हावे.
१४) प्रथम१० स्पर्धकांना शिष्यवृत्ती दिली जाईल

**Guide to participate** in an online training program on organ donation awareness.

1) It is very simple,
2) open the Registration link and do online registration,
3) the training consist of 8 chapters, having eight questionnaires,
4) Link of Soft copy of study material is given below,
5) besides this last paragraph of registration form & of every questionnaire gives link for study material of next chapter,
6) no sooner a response to questionnaire is submitted, students score is instantaneously informed by email,
7) Students have chance to improve the score by resubmission of the same questionnaire, within next 24 hours,
8) minimum 50% score is required to pass / clear each chapter,

9) when all 8 chapters are complete, within next fortnight the E-certificate will be emailed to the student.
10) study material (soft copy) consist of one video lecture, one writeup, one questionnaire and a small interesting video,
11) **Top 15 colleges** from which maximum number students complete the training will be honored by a **Certificate of honor to the NSS Program officers and Scholarships to their NSS student secretaries**, in proportion of one scholarship for every 250 students completing the training,
12) for more information / queries one can join following Telegram group using a link
13) beside this **on Sunday 26 February, 2023 at 10:30 a.m.** online Quiz Contest will be held, for which there is no separator registration, only the student should join another specific Telegram group using a separate link
14) **Top 10 contestants** will be awarded scholarships

**Links**

Link of Registration form
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSc9o5IiN-4tO4BkD0CobQ8xbqC-SieLzBmbLubNxX3OqWzhvA/viewform?usp=share_link


Link of Study Material ( soft copy)
https://drive.google.com/drive/folders/1IY67rhIVQw5eihnaffV38UUDYpDDtB5u?usp=share_link

Link of Students Telegram group
https://t.me/+UYIuBXX8FZU1Y2VI

Link of Online Contest Telegram group
https://t.me/+QRuVvELjqvI5ODc1

,

Yours faithfully,



**Aptekaka**
President, v4organs foundation,
and online training coordinator